## निशाणी क्र. १९ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रस्तूत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र. ६ राधाबाई शांताराम माळकर ही दि. ०३/०६/२०२१ रोजी मयत झाली आहे. सदर कालावधीमध्ये कोविड १९ चा आजार असल्यामुळे सदर प्रतिवादीच्या मृत्यूबाबत वादीस पुरेशी माहिती नव्हती. तसेच सदरचे वारस हे मुदतीत दाखल करावयाचे असतात याचे ज्ञात नसल्यामुळे सदर प्रतिवादीचे वारस मुदतीत दाखल करता आलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी विरुध्द दावा अबेट झाला आहे. सबब, सदर अबेटमेंट आदेश रद्द करून प्रस्तूत प्रतिवादी यांचे वारस दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत अर्जात दिलेले कारण योग्य व संयुक्तिक नाही. सबब प्रस्तूत अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ ही दि. ०३/०६/२०२१ रोजी मयत झाली आहे, असे दिसून येते. प्रस्तूत प्रतिवादी ही मयत झाली आहे, याबाबत वाद दिसून येत नाही. सदरचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे:

**–आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक: ०१/१२/२०२१

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2021.12.02 15:04:53 +0530